१६७

राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या
६ जिल्हयांसाठी विशेष पॅकेज-
तातडीची मदत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७
महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- २७ फेबुवारी,२००६

वाचा:-१)शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७,दिनांक १९.१२.२००५
२)शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३.१.२००६

राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या हा एक गंभीर विषय असून त्यावर प्रभावी उपाययोजना कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय क्र.एससीवाय/१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक १९.१२.२००५ अन्वये विशेष पॅकेज घाषित करण्यात आले आहे. तसेच राज्यात होत असलेल्या शेतकरी आत्महत्यांबाबत मृत शेतक-यांच्या वारसांना मदत देण्यासाठी शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७,दिनांक २३.१.२००६ अन्वये जिल्हास्तरावर समिती गठीत करण्यात आली असून शेतकरी आत्महत्या प्रकरणांची त्वरित तपासणी करुन पात्र प्रकरणांत शेतक-यांच्या कुटूंबियांना मदत देण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरीय समितीवर सोपविण्यात आली आहे. विशेष पॅकेजमधील विविध मुद्यांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी तसेच मृत शेतक-यांच्या वारसांना मदत देण्याबाबतचे निकष तपासण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक २४.२.२००६ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले:-

शासन निर्णय:-

१) मृत शेतक-यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करतेवेळी सदर व्यक्ती शेतकरी होता किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात येत असून मृत व्यक्तीच्या कुटूंबातील कोणतीही व्यक्ती शेजजमीन धारण करित असेल तर सदर व्यक्तीस शेतकरी म्हणून गृहीत धरण्यात यावे.

२) मृत शेतक-यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करतांना सदर व्यक्तीने शेतीसाठी, शेती सुधारण्यासाठी कर्ज घेतले होते किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात येत असून मृत व्यक्तीच्या कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीने राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था व मान्यताप्राप्त सावकार यांचेकडुन कर्ज घेतले असल्यास, व सदर कर्जाची परतफेड न करता आल्यामुळे कर्जाचे हप्ते प्रलंबित असल्यास, सदर व्यक्तीस मदतीसाठी पात्र ठरविण्यात यावे.

३) यापूर्वी झालेल्या शेतकरी आत्महत्यांप्रकरणी चौकशीअंती शासकीय मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आलेली सर्व प्रकरणे शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७,दिनांक २३.१.२००६ अन्वये जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीकडे फेरचौकशीसाठी देण्यात यावीत. सदर समितीने अशा सर्व प्रकरणांची सुधारित निकषांनुसार तपासणी करुन प्रकरण मदतीसाठी पात्र

K. W. Sofkin

अथवा अपात्र म्हणून घोषित करावे व पात्र प्रकरणांत नियमानुसार मदत देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुरेश काकाणी)

शासनाचे उप सचिव,महसूल व वन विभाग.

प्रति,

मार्च मंत्री व राज्यमंत्री